आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4 थे

www.metrocityvrutant.in शनिवार दिनांक 10/10/2026 METRO CITY VRUTANT

> संपादक : रफी हुसेन > पिंपरी चिंचवड व पुणे > पान 4 > अंक 215 > RNI - MAHMAR /2021/51259 > metrocity924@gmail.com

# आंदोलन प्रकरणी एमपीएससी परीक्षार्थ्यांवर गुन्हा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : आंदोलनाची परवानागी रद्द केल्याची माहिती दिल्यानंतर नवी पेठेतील लालबहाद्दुर शास्त्री रस्त्यावर बेकायदा आंदोलन केल्या प्रकरणी एमपीएससी विद्यार्थी प्रतिनिधींसह 15 जणांविरुद्ध विश्रामबाग पोलिसांनी गुन्हा दाखल केला. या आंदोलनामुळे शास्त्री रस्ता परिसरातील वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली, तसेच सार्वजनिक शांतता, कायदा आणि सुव्यवस्थेला बाधा निर्माण झाल्याचे पोलिसांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.**




याबाबत पोलीस हवालदार समीर पवार यांनी विश्रामबाग पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी प्रमोद पाटील, अक्षय कांबळे, अनिकेत देशमाने, प्रवीण पाटील, ऋषीकेश गांगुर्डे, प्रियांका चौधरी, नितीन गिते, सोमनाथ चव्हाण, ओंकार पाटील, गजानन शेळके, अजित काकडे, सिद्धार्थ पंचांगे, संकेत कणसे, सिद्धार्थ जांभुळकर, साहेबराव क्षीरसागर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एमपीएससी विद्यार्थी प्रतिनिधींनी 25 सप्टेंबर रोजी आंदोलन करण्यासाठी पोलिसांकडे परवानगी मागितली होती. 2 ऑक्टोबर रोजी, लोकमान्य टिळक चौक (अलका टॉकीज), अहिल्या अभ्यासिका आणि नवी पेठेतील गांजवे चौक परिसरातील एस. एम. जोशी पूल परिसरात आंदोलन करण्याची परवानगी देण्यात आली.

30 सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री आणि विद्यार्थी प्रतिनिधींमध्ये झालेल्या चर्चेनंतर आंदोलन स्थगित करण्यात आल्याचे पत्र पोलिसांना देण्यात आलो. आंदोलनासाठी देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यात आल्याची माहिती विद्यार्थी प्रतिनिधींना देण्यात आली होती. त्यानंतर 1 ऑक्टोबर रोजी दुपारी चारच्या सुमारास नवी पेठेतील इंदूलाल कॉम्प्लेक्ससमोर विद्यार्थी मोठ्या संख्येने जमले.

विद्यार्थी प्रतिनिधींनी परवानगी नसताना आंदोलन सुरु केले.

# जंतर मंतरवर जाण्यासाठी महाराष्ट्र पोलिसांची आडकाठी!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉक्रोच जनता पार्टीने 10 ऑक्टोबर रोजी देशव्यापी आंदोलनाची हाक दिली आहे. राजधानी दिल्लीतील जंतर-मंतर येथेही मोठ्या आंदोलनाचे नियोजन करण्यात आले असून, महाराष्ट्रातील कार्यकर्ते आणि आंदोलक त्यात सहभागी होण्याची शक्यता आहे. दरम्यान, या आंदोलनात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांच्या हालचालींवर महाराष्ट्र पोलिसांकडुन नजर ठेवली जात असल्याचा दावा काही आंदोलकांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर आंदोलनाच्या तयारीला वेग आला असून, पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.**



'इंडियन एक्स्प्रेस'ने काही संभाव्य आंदोलकांशी संवाद साधल्यानंतर ही माहिती समोर आली आहे. आंदोलनात सहभागी होण्याची शक्यता असलेल्या काही नागरिकांना पोलिसांकडून त्यांच्या प्रवासाचे नियोजन, दिल्लीला जाण्याची तारीख आणि इतर तपशील विचारले जात असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. काही संभाव्य आंदोलकांना ताब्यात घेण्यात आल्याचाही दावा करण्यात आला. मात्र, महाराष्ट्र पोलीस महासंचालक कार्यालयातील एका अधिकाऱ्याने हा दावा फेटाळून लावला आहे. काही आंदोलकांना प्रतिबंधात्मक नोटिसा बजावण्यात आल्या असल्या, तरी राज्यात अद्याप कोणालाही ताब्यात घेण्यात आलेले नाही, असे संबंधित अधिकाऱ्याने स्पष्ट केले.

सांताक्रूझ येथील 31 वर्षीय क्रिएटिव्ह स्ट्रॅटेजिस्ट सदफ रझा झैदी यांनी पोलिसांकडून चौकशी करण्यात आल्याचा अनुभव सांगितला. त्यांच्या म्हणण्यानुसार, काही पोलीस अधिकारी त्यांच्या घरी आले होते. त्यांनी 10 ऑक्टोबर रोजी कुठे जाणार आहात, अशी विचारणा केली. आपण आंदोलनाला जाणार नसल्याचे सांगितल्यानंतर आंदोलनात सहभागी होण्यासाठी दिल्लीला जाणाऱ्या कोणाला ओळखता का, असा प्रश्नही त्यांना विचारण्यात आला.तसेच, पोलीस ठाण्यात येऊन एका कागदावर स्वाक्षरी करण्यास सांगण्यात आले. त्या कागदावर आपण आंदोलनात सहभागी होणार नसल्याचे नमूद असल्याचे झैदी यांनी सांगितले. संभाव्य आंदोलकांची माहिती गोळा करण्याचे आदेश असल्याचे पोलिसांनी आपल्याला सांगितल्याचा दावाही त्यांनी केला.

दरम्यान, नागपूरमध्येही संभाव्य आंदोलकांना प्रवासासंदर्भातील माहिती देण्याचे निर्देश दिल्याचे समोर आले आहे. महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम 37(1)(3) अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू असल्याचे सांगत, वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी बनाईत यांना दिल्ली प्रवासाची तारीख, प्रवासाचे माध्यम आणि त्यांच्यासोबत कोण कोण जाणार आहे, याची माहिती देण्यास सांगितल्याचे वृत्त आहे. ही माहिती न देता दिल्लीला गेल्यास कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते, असा इशाराही देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

10 ऑक्टोबर रोजी होणाऱ्या देशव्यापी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील संभाव्य आंदोलकांच्या हालचाली आणि प्रवासाच्या नियोजनाबाबत पोलिसांकडून चौकशी केली जात असल्याचे दावे पुढे आले आहेत. दुसरीकडे, पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतल्याचा दावा फेटाळत केवळ काहींना नोटिसा दिल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे या प्रकरणात आंदोलकांचे आरोप आणि पोलिसांची भूमिका यांवर लक्ष केंद्रित झाले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 10/10/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# एमआयटी एडीटी विद्यापीठात व्यसनमुक्तीचा जागर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : तरुणाईला व्यसनमुक्त जीवनाचा संदेश देण्यासाठी एमआयटी आर्ट, डिझाइन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने 'विकसित भारत संकल्प अभियाना'अंतर्गत 'नशामुक्त युवा' उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले.**



या उपक्रमाद्वारे युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्यात आली तसेच निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी पोलीस आणि आरोग्य क्षेत्रातील मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाला पुणे शहरातील हडपसर विभागाच्या सहाय्यक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले, लोणी-काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीपकुमार पवार, विश्वराज हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अनिरुद्ध गरुड, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., कुलसचिव डॉ. महेश चोपडे, परीक्षा नियंत्रक डॉ. ज्ञानदेव निलवर्ण आणि राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) संचालक प्रा. विशाल पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.या अभियानांतर्गत युवकांना व्यसनांचे दुष्परिणाम समजावून सांगणे, व्यसनांपासून दूर राहण्यासाठी प्रेरित करणे आणि समाजात व्यसनमुक्तीचा सकारात्मक संदेश पोहोचविणे यावर भर देण्यात आला. युवकांनी व्यसनांपासून दूर राहून स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी आणि निरोगी व सक्षम भारताच्या निर्मितीत योगदान द्यावे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या पुढाकाराने आयोजित या उपक्रमातून युवकांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणे, आरोग्यविषयक जागरुकता वाढविणे आणि व्यसनमुक्त भारताच्या संकल्पनेला बळकटी देण्याचा संदेश देण्यात आला.

# 'द मनमौजी'मध्ये रंगली वैभव जोशी यांची काव्यमैफल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी: कधी शब्दांतून फुलणारे प्रेम, कधी मिश्कील ओळींतून उमटणारा हास्याचा खळखळाट, तर कधी आईच्या आठवणीने मनाच्या कोपऱ्यात दाटून येणारी हुरहूर... कवितेच्या अशा विविध भावछटांनी सजलेली मैफल म्हणजे 'द मनमौजी'. प्रसिद्ध कवी आणि गीतकार वैभव जोशी यांच्या शब्दांनी, सादरीकरणाने आणि मनमोकळ्या संवादाने चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात रंगलेल्या या कार्यक्रमाने रसिकांना कधी हसवले, कधी प्रेमाच्या तरल भावविश्वात रमवले, तर कधी भावुक केले.**




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या निमित्ताने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.'द मनमौजी' हा केवळ कविता आणि गझल सादर करण्याचा कार्यक्रम नसून शब्द, संगीत आणि संवाद यांच्या माध्यमातून रसिकांशी भावबंध जोडणारा अनुभव ठरला. वैभव जोशी यांनी आपल्या विविध रचनांमधून प्रेम, सौंदर्य, निसर्ग, मानवी स्वभाव, आयुष्यातील गमतीजमती आणि आईविषयीचे प्रेम अशा विषयांना स्पर्श केला. त्यांच्या सादरीकरणातील सहजता, शब्दांमधील लय आणि आशयातील विविधता यामुळे संपूर्ण मैफल रंगतदार झाली.कार्यक्रमातील काही रचनांनी आपल्या मिश्कील शैलीतून रसिकांना खळखळून हसवले. 'एक पेग म्हणता म्हणता दोन-चार झाले, सशासारखे जिने एकदम पाणीदार झाले' अशा ओळींमधून त्यांनी मानवी स्वभावातील गमतीशीर पैलू प्रभावीपणे उलगडले. साध्या प्रसंगातून विनोद निर्माण करण्याची हातोटी, शब्दांची अचूक निवड आणि सादरीकरणातील सहजता यांमुळे या रचनेला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कवितेतील विनोद केवळ हसवणारा न राहता दैनंदिन जगण्यातील विसंगतींकडे मिश्कीलपणे पाहण्याची दृष्टी देणारा ठरला.वैभव जोशी यांची लोकप्रिय रचना 'मन तुझे जलतरंग, लहरी तुझा साज' या कवितेने कार्यक्रमात प्रेमाच्या भावविश्वाला सुरेल स्पर्श दिला. मनातील भावनांची लय, शब्दांचे नादमाधुर्य आणि प्रेमाच्या अनुभूतीचे काव्यमय चित्रण यांमुळे या रचनेने रसिकांचे लक्ष वेधून घेतले. शब्दांच्या लयीतून आणि भावपूर्ण सादरीकरणातून खुलणाऱ्या या कवितेला प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 10/10/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# महापालिका मुख्यालयात दिवंगत अजित पवार यांचे तैलचित्र

## आमदार महेश लांडगे यांची सूचना अन् महापालिका प्रशासनाची कार्यवाही

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी- चिंचवड । दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे तैलचित्र पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रवेशद्वाराच्या दर्शनी भागात लावण्यात आले आहे. आमदार महेश लांडगे यांनी याबाबत महापालिका प्रशासनाकडे दि.31 जानेवारी 2026 रोजी पत्राद्वारे मागणी केली होती. त्यानुसार आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून तैलचित्र लावण्याचे काम पूर्ण करण्यात आली आहे.**



महापालिकेच्या स्थापत्य विभागाच्या माहितीनुसार, आमदार लांडगे यांनी महापालिका मुख्यालयात दिवंगत अजित पवार यांचे तैलचित्र लावण्याची मागणी केली होती. या मागणीच्या अनुषंगाने महापालिका प्रशासनाने कार्यवाही केली. स्थापत्य विभागामार्फत मुख्य कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळील दर्शनी भागात तैलचित्र लावण्यात आल्याचे प्रशासनाच्या पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे. तैलचित्र लावण्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, प्रत्यक्ष तैलचित्र लावण्याचे कामही पूर्ण झाले आहे, असे महापालिकेने कळविले आहे. महापालिकेच्या स्थापत्य विभागाचे मुख्य अभियंता-1 प्रमोद ओंभासे यांच्या स्वाक्षरीने हे पत्र आमदार महेश लांडगे यांना पाठविण्यात आले आहे. त्यामध्ये लांडगे यांच्या मागणीचा संदर्भ देत केलेल्या कार्यवाहीची माहिती नमूद करण्यात आली आहे.

महापालिका मुख्यालयात येणाऱ्या नागरिकांच्या आणि अभ्यागतांच्या नजरेस पडेल अशा प्रवेशद्वाराच्या दर्शनी भागात हे तैलचित्र लावण्यात आले आहे. दिवंगत अजित पवार यांच्या स्मृतींना महापालिकेच्या मुख्य कार्यालयात स्थान देण्यासंदर्भातील मागणीवर प्रशासनाने कार्यवाही पूर्ण केल्याची अधिकृत नोंद या पत्राद्वारे करण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवडमधील रस्ते रुंदीकरण आणि पायाभूत सुविधांच्या विस्तारासाठी अजित पवार यांनी पाठपुरावा केला होता. पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून विकास प्रकल्पांच्या प्रत्यक्ष पाहण्या आणि प्रशासकीय आढावा बैठकांमधूनही त्यांनी कामांच्या अंमलबजावणीवर लक्ष दिले होते.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री म्हणून त्यांचे योगदान अविस्मरणीय आहे. याबाबत कृतज्ञता म्हणून महापालिका मुख्यालयात त्यांचे तैलचित्र लावण्यात आले आहे.

# शहरात बांधकामांसाठी पाणी मिळणार नाही!

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : एल निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमानात मोठी घट झाल्याने 31 ऑगस्ट 2027 पर्यंत धरणातील उपलब्ध पाणीसाठा काटकसरीने वापरावा. बांधकाम, औद्योगिक, व्यावसायिक वापरासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करू नये. यासाठी प्रक्रियायुक्त पाण्याचा वापर करावा. पिंपरी-चिंचवड शहरात दहा टक्के पाणी कपात तत्काळ लागू करावी, असे पत्र जलसंपदा विभागाने महापालिका आयुक्तांना दिले आहे. पाणी बचतीसाठी विविध उपाययोजना करण्याच्या सूचना पत्रातून दिल्या आहेत.**




पाणीपुरवठा यंत्रणेतील गळती, पाण्याचा अपव्यय व अनधिकृत पाणी वापराचे सर्वेक्षण करून त्यावर तातडीने कार्यवाही करावी. महापालिकेची उद्याने, बागा, दुभाजक, हिरवळ व इतर योग्य वापरांसाठी शक्य त्या ठिकाणी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुनर्वापर करावा. बांधकाम, औद्योगिक, व्यावसाय, धुलाई, हिरवळीसाठी प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा वापर करावा. पाणी बचत, पाण्याचा काटकसरीने वापर व अनावश्यक पाणी वापर टाळण्याबाबत व्यापक जनजागृती करावी.

उपलब्ध पाणीसाठ्याबाबत 31 ऑगस्ट 2027 पर्यंतचे नियोजन करावे. त्याचा अहवाल जलसंपदा विभागाला सादर करावा, अशा सूचना महापालिकेला दिल्या आहेत. पाणी कपात न केल्यास भविष्यात पाणी टंचाई निर्माण झाल्यास त्याला महापालिका जबाबदार राहील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.पाण्याची तूट असल्याने नव्याने विकसित झालेल्या आणि टोलेजंग इमारती असलेल्या वाकड भागातील 200 ते 500 सदनिका असलेल्या 34 गृहनिर्माण सोसायट्यांना 50 टक्केच पाणी पुरवठा महापालिकेकडून केला जात आहे. त्यामुळे या सोसायट्यांना टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. शंभर टक्के पाणीपुरवठा करण्याची सोसायटीधारकांची मागणी आहे. परंतु, भामा-आसखेडचे पाणी आल्याशिवाय शंभर टक्के पाणी देता येणार नसल्याचे पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 10/10/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# सायकल स्पर्धेसाठी कोट्यवधींची उधळपट्टी कशासाठी?- संदीप वाघेरे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड महापालिकेची आर्थिक परिस्थिती बिकट असताना आणि शहरातील विविध विकासकामांसाठी निधीची कमतरता भासत असताना, जानेवारी महिन्यात प्रस्तावित पुणे ग्रँड टूर सायकल स्पर्धेसाठी महापालिकेच्या तिजोरीतून निधी देण्यास तीव्र विरोध करण्यात आला आहे. या स्पर्धेसाठी निधी देण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव प्रशासनाने मान्य करू नये, अशी मागणी नगरसेवक व स्थायी समिती सदस्य संदीप वाघेरे यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.**



शहरातील प्रमुख तसेच अंतर्गत रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असून अनेक ठिकाणी खड्ड्यांमुळे नागरिकांना आणि वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यांची अक्षरशः चाळण झाल्याने वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. अशा परिस्थितीत नागरिकांच्या मूलभूत सुविधा आणि प्रलंबित विकासकामांना प्राधान्य देण्याऐवजी सायकल स्पर्धेसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करणे योग्य नाही, अशी भूमिका वाघेरे यांनी मांडली."एका बाजूला विकासकामांसाठी निधी उपलब्ध नसल्याचे सांगितले जाते, कर्ज काढण्याचा सल्ला दिला जातो आणि दुसऱ्या बाजूला सायकल स्पर्धेसाठी महापालिकेच्या तिजोरीतून कोट्यवधी रुपये खर्च करण्याची तयारी केली जाते. हा विरोधाभास कोणत्या आर्थिक धोरणात बसतो?", असा सवाल वाघेरे यांनी उपस्थित केला.करदात्या नागरिकांकडून वसूल होणाऱ्या पैशांचा विनियोग प्रथम नागरिकांच्या मूलभूत सुविधा, रस्ते, पाणी, वाहतूक व्यवस्था आणि आवश्यक नागरी विकासकामांसाठी झाला पाहिजे. नागरिकांना खड्डेमय रस्ते आणि वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असताना केवळ एका क्रीडा स्पर्धेसाठी महापालिकेचा निधी खर्च करणे म्हणजे करदात्यांच्या पैशांच्या वापराचे चुकीचे प्राधान्यक्रम ठरविणे होय, असा आरोप त्यांनी केला.पुणे ग्रँड टूर ही व्यापक स्वरूपाची स्पर्धा असल्यास तिचा आर्थिक भार राज्य शासनाने उचलावा. शासनाकडून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी शहरातील आमदारांनी पुढाकार घ्यावा आणि आपल्या राजकीय प्रभावाचा वापर करून महापालिकेवर आर्थिक भार पडणार नाही, याची काळजी घ्यावी, अशी मागणी वाघेरे यांनी केली.

# पुण्यात 'प्रहार'चा प्रमोशनल जल्लोष राजकुमार, वामिका यांची उपस्थिती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**प्रख्यात सरकारी वकील पद्मश्री ॲड. उज्ज्वल निकम यांच्या रोमहर्षक जीवनप्रवासावर आधारित बहुचर्चित 'प्रहार: द अनटोल्ड स्टोरी ऑफ उज्ज्वल निकम' या चित्रपटाच्या प्रमोशननिमित्त चित्रपटाची टीम नुकतीच पुण्यात दाखल झाली होती. सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्यातील रसिकांनी या टीमचे अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात स्वागत केले. या प्रमोशन सोहळ्याला मुख्य अभिनेता राजकुमार राव, मुख्य अभिनेत्री वामिका गब्बी यांच्यासह स्वतः ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. उज्ज्वल निकम यांची विशेष उपस्थिती लाभली होती.**



पुण्यात झालेल्या या कार्यक्रमाला प्रेक्षकांची तुफान गर्दी उसळली होती. चाहत्यांनी आणि उपस्थितांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाने संपूर्ण वातावरण भारावून गेले होते. उपस्थित मान्यवर आणि रसिकांनी चित्रपटाच्या संपूर्ण टीमवर कौतुकाचा वर्षाव करत चित्रपटाला भरभरून शुभेच्छा दिल्या. चित्रपटाची कथा, न्यायव्यवस्थेतील आव्हाने आणि न्यायालयीन लढा मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता पाहायला मिळाली.

कार्यक्रमादरम्यान मुख्य अभिनेता राजकुमार राव याने आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, "ॲडव्होकेट उज्ज्वल निकम यांच्यासारख्या महान व्यक्तिमत्त्वाचा बायोपिक करायला मिळणे ही माझ्यासाठी अत्यंत मोठी आणि अभिमानास्पद बाब आहे. त्यांच्या कारकिर्दीचा पट अत्यंत विस्तीर्ण आणि आव्हानात्मक आहे. ही भूमिका पडद्यावर जिवंत करताना केवळ त्यांची नक्कल न करता, त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील बारकावे आत्मसात करून ती भूमिका प्रामाणिकपणे जगण्याचा मी पूर्ण प्रयत्न केला आहे. हा चित्रपट माझ्या संपूर्ण कारकिर्दीतील एक मैलाचा दगड ठरेल."

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968